CMYK

शिवसेना मुख्यनेते एकनाथराव शिंदे यांची केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी घेतली सदिच्छा भेट >>पान 2

महाराष्ट्राला जागतिक गुंतवणुकीचे केंद्र बनविण्याचा संकल्प : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस >>पान 3

'राष्ट्रीय आयुष मिशन आणि राज्यांतील क्षमता विकास' या विषयावरील विभागीय परिषदेचे अखिल भारतीय आयुर्वेद संस्थान, नवी दिल्ली येथे झाले उद्घाटन >>पान 4

**सुविचार**

आपल्या कार्यात उत्साह ठेवा.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 44 ■ गुरूवार, दि. 04 सप्टेंबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006





अभिनेत्री पूनम पांडेचा मराठमोळा लूक, बाप्पाच्या दर्शनासाठी आल्यानंतर मराठीत संवाद साधला

आतील पान

# मराठा आरक्षण: जीआरबाबात संभ्रम

## आम्ही कोर्टात जाऊ, सरकारच्या निर्णयाविरोधात मंत्री छगन भुजबळांची भूमिका

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी : राज्य सरकारने मराठा आरक्षणावर काढलेल्या जीआरवर त्यांचेच मंत्री छगन भुजबळांनी नाराजी व्यक्त केली आहे. ओबीसी कार्यकर्त्यांनी राज्यभर जिल्हाधिकारी, तहसीलदार यांना निवेदन द्यावं आणि ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लावू नये अशी मागणी करावी असं आवाहन छगन भुजबळांनी केलं. सरकारच्या या जीआरवर आम्हाला संभ्रम आहे, ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागत असेल तर त्या विरोधात आम्ही न्यायालयात जाऊ असंही छगन भुजबळ म्हणाले.**

मनोज जरांगे यांच्या आंदोलनानंतर राज्य सरकारने मराठा आरक्षणाचा नवा जीआर काढला. त्यामध्ये हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. या गोष्टीला ओबीसी नेत्यांनी विरोध दर्शवला. राज्य सरकारच्या या निर्णयाविरोधात मंत्री छगन भुजबळांनीही नाराजी व्यक्त केली आणि मंत्रिमंडळाच्या बैठकीवरही बहिष्कार टाकल्याचं दिसून आलं.

छगन भुजबळ म्हणाले की, या जीआर बाबत अद्याप संभ्रम आहे. याबाबात आमच्या नेत्यांनी आणि अभ्यासकांनी, राज्यात वेगवेगळ्या ठिकाणी निवेदनं दिली आहेत. काही ठिकाणी ओबीसी कार्यकर्त्यांनी उपोषण सुरू केले आहेत. अनेक कायदेतज्ज्ञ, वकील आणि इतरांशी चर्चा करून याची माहिती घेत आहोत. जर आवश्यक असेल तर चर्चा करून येत्या चार दिवसात त्या विरोधात न्यायालयात जाऊ.

या जीआरच्या विरोधात न्यायालयात जाण्याची आमची तयारी असून त्यासाठी ज्या कागदपत्रांची जुळवाजुळवी करावी लागेल ती आम्ही करू असं छगन भुजबळ म्हणाले. राज्यातील कार्यकर्त्यांनी त्या-त्या ठिकाणच्या जिल्हाधिकारी आणि तहसीलदारांना ओबीसींच्या हक्कांवर गदा येऊ देऊ नये अशी निवेदनं द्यावीत. आपले म्हणणे शांतपणे मांडावं. या व्यतिरिक्त जर कुणी उपोषण करत असेल किंवा इतर काही मार्ग पत्करत असेल तर त्या गोष्टी तूर्तास थांबवाव्यात असं भुजबळ म्हणाले.

मुंबईतल्या मराठा आंदोलनामुळे उडालेली धूळ खाली बसत नाही, तोच आता राज्यभरातील ओबीसी समाज आक्रमक झाल्याचं दिसतंय. यातील सर्वांत मोठे हिरो ठरले ते छगन भुजबळ. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीसाठी ते सह्याद्री अतिथीगृहावर पोहोचले खरे, मात्र बैठकीत काही सहभागी झाले नाहीत.

राष्ट्रवादीच्या मंत्रिमंडळपूर्व बैठकीला हजेरी लावून ते निघून गेले. त्यांना मंत्रिमंडळ बैठकीला दांडी मारण्याचं नेमकं कारण विचारण्याचा प्रयत्न माध्यमांनी केला खरा, मात्र भुजबळ काहीही न बोलता निघून गेले. त्यामुळे मग ते नाराज असल्याची आणखीनच चर्चा रंगली. तिथून ते थेट भुजबळ नॉलेज सिटीमध्ये पोहोचले आणि त्या ठिकाणी प्रकाश शेंडगेंसह अनेक ओबीसी नेत्यांसोबत त्यांनी चर्चा केली.

## ओबीसी उपसमितीच्या अध्यक्षपदी चंद्रशेखर बावनकुळे ; भुजबळांसह ८ मंत्र्यांचा समावेश

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी:** मराठा आरक्षणासाठी मोठा निर्णय घेतल्यानंतर राज्य सरकार आता ओबीसींसाठीही महत्त्वाचं पाऊल उचलण्याच्या तयारीत आहे. ओबीसींच्या विकासासाठी स्वतंत्र मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करण्यात येणार असून चंद्रशेखर बावनकुळे त्याचे अध्यक्ष असतील. या उपसमितीत छगन भुजबळ, पंकजा मुंडे यांच्यासह एकूण आठ मंत्री असणार आहेत.

राज्य सरकारने नुकतेच मराठा आरक्षणासंबंधी हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याविरोधात ओबीसी नेत्यांनी आवाज उठवला. राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांनी तर मंत्रिमंडळाच्या बैठकीवर बहिष्कार टाकला. त्यानंतर आता ओबीसींसाठीही उपसमितीच्या माध्यमातून विकासात्मक निर्णय घेण्याचा निर्णय झाल्याची माहिती आहे.

ओबीसींच्या विकासासाठी ही उपसमिती गठीत करण्यात येणार असून त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक स्थितीबाबत कार्यक्रम आखले जाणार आहेत. तसेच ओबीसांच्या योजनांबाबत ही समिती कामकाज पाहणार आहे. या समितीचे अध्यक्षपद हे भाजपचे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे असणार आहे. तर या समितीत भाजपचे चार, राष्ट्रवादीचे दोन आणि शिवसेनेचे दोन मंत्री असणार आहेत. यामध्ये छगन भुजबळ, गणेश नाईक, गुलाबराव पाटील, संजय राठोड, पंकजा मुंडे, अतुल सावे, दत्तात्रय भरणे हे समितीचे सदस्य असतील.

मराठा आरक्षणासाठी काढलेल्या जीआरमुळे ओबीसी नेत्यांच्या मनात संभ्रम आहे, त्यामुळे वकिलांचा सल्ला घेणार असून कोर्टात जाणार असल्याचं मंत्री छगन भुजबळांनी स्पष्ट केलं आहे. कुठल्याही जातीला दुसऱ्या जातीत टाकण्याचा हक्क सरकारला नाही, अशी



प्रतिक्रिया भुजबळांनी दिली.

छगन भुजबळ नाराज आहेत, याचा अर्थ सरकारनं काढलेला अध्यादेश पक्का आहे असा टोला मराठा आंदोलक मनोज जरांगेंनी लगावला. काही चुकलं असेल तर पुन्हा जीआर काढायला लावू, असं त्यांनी स्पष्ट केलं. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळालं असल्याचं सांगत त्यांनी मराठा समाजाला आश्र्वस्त केलं.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे गुरूवारी सकाळी ११ वाजता नागपुरात सुरू असलेल्या राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या साखळी उपोषणाला भेट देणार आहेत. यावेळी ते महासंघाचे अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे यांच्याशी चर्चा करतील. फडणवीसांच्या भेटीनंतर ओबीसींचे सुरू असलेले साखळी उपोषण मागे घेतलं जाण्याची शक्यता आहे.

## सणासुदीच्या काळात केंद्र सरकारच सर्वसामान्यांना मोठं गिफ्ट; जीएसटीचे दोन स्लॅब रद्द, जीवनावश्यक वस्तू होणार स्वस्त



नवी दिल्ली : सणासुदीच्या काळात केंद्र सरकारनं सर्वसामान्यांना आणि व्यापाऱ्यांना मोठा दिलासा देणारा निर्णय घेतला आहे. आधी असलेल्या जीएसटीच्या चार स्लॅबपैकी १२ टक्के आणि २८ टक्क्यांचा स्लॅब रद्द करण्यात आलाय. त्यामुळं देशात आता फक्त ५ टक्के आणि १८ टक्के असे दोनच जीएसटी स्लॅब असतील. सरकारच्या या निर्णयामुळं इलेक्ट्रॉनिक वस्तू, खाद्यपदार्थ, साबण, कपडे, पादत्राणे यासह रोजच्या वापराच्या गोष्टी स्वस्त होणार आहेत. सरकारचा हा निर्णय नवरात्रीच्या पहिल्या दिवशी, म्हणजे २२ सप्टेंबरपासून लागू होणार आहे.

केंद्र सरकारचा मोठा निर्णय : नवी दिल्लीत जीएसटी कौन्सिलची महत्त्वाची बैठक पार पडली. त्यामध्ये हा मोठा निर्णय घेण्यात आलाय. स्वातंत्र्यदिनी केलेल्या भाषणामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जीएसटीमध्ये बदल होणार असं सांगितलं होतं. त्यावर आता बैठकीत मोठा निर्णय घेण्यात आलाय. या निर्णयामुळं सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असल्याची प्रतिक्रिया केंद्र सरकारकडून मिळत आहे.

कसा आहे नवीन बदल? : देशात लागू असलेल्या १२ टक्के आणि २८ टक्क्यांचा स्लॅब रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आलाय. त्यामुळं ज्या वस्तूंवर आधी २८ टक्के जीएसटी लागायचा, त्यावर आता १८ टक्के जीएसटी लागणार आहे. त्याचबरोबर ज्या वस्तूंवर आधी १२ टक्के जीएसटी लागायचा, त्यावर आता पाच टक्के जीएसटी लागणार आहे. तर काही वस्तूंवरील जीएसटी हा शून्य टक्के करण्यात आलाय.

लक्झरी वस्तूंवर ४०% जीएसटी : ४० टक्क्यांच्या या उच्च स्लॅबमध्ये महागडी लक्झरी आयटेम्स तसेच वैध नशेचे पदार्थ ठेवण्यात आले आहेत. यामध्ये दारू, तंबाखू आणि सिगारेट्स यांचा समावेश आहे. सरकारचा उद्देश स्पष्ट आहे, समाजातील लोकांना दारू आणि धूम्रपानापासून दूर ठेवण्यासाठी त्यावर अधिक कर लावण्यात आला आहे.

कररचना झाली सोपी : निर्मला सीतारामन यांनी सांगितले की, आता जास्तीत जास्त वस्तू १८% आणि ५% या दोनच स्लॅबमध्ये राहतील. ४०% कर फक्त 'सिन गुड्स' आणि सुपर लक्झरी उत्पादनांवरच लागू होईल. त्यांच्या मते, या सुधारांमुळे सामान्य जनता, शेतकरी आणि कामगार वर्गाला दिलासा मिळणार आहे. तर हानिकारक वस्तूंवर सरकारने उच्च कर कायम ठेवला आहे.

## अटल सेतुसह अन्य टोल नाक्यावर इलेक्ट्रिक वाहनांना टोलमाफी: प्रताप सरनाईक

**मुंबई/प्रतिनिधी:** राज्यातील इलेक्ट्रिक वाहन उद्योगाला व वाहनधारकांना चालना देण्यासाठी टोल नाक्यावर टोलमाफी देण्याचे धोरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व दोन्ही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य शासनाने घेतले होते. त्यानुसार २१ ऑगस्ट पासून अटल सेतूसह मुंबई -पुणे द्रुतगती महामार्ग तसेच समृद्धी महामार्गावरील सर्व टोल नाक्यांवर इलेक्ट्रिक वाहनांना टोल माफी करण्यात येत असल्याची अधिसूचना राज्य सरकारने जारी केली आहे. अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.मंत्री सरनाईक म्हणाले की, महाराष्ट्र शासनाने मोटार वाहन कर अधिनियम १९५८ अंतर्गत निर्गमित केलेल्या अधिसूचनेनुसार सर्व प्रकारच्या इलेक्ट्रिक वाहनांना वाहनांना ठराविक म ार्गावरून प्रवास करताना टोल नाक्यांवरून सूट देण्यात आली आहे. त्यानुसार शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार, कोणत्या इलेक्ट्रिक चारचाकी व बस वाहनांना टोल करातून सूट दिली जाणार आहे ते पाहूया.

या श्रेणीतील वाहनांना मिळणार टोल माफी- एम२, एम३, एम६ श्रेणीतील इलेक्ट्रिक चारचाकी वाहने, इलेक्ट्रिक बसेस -राज्य परिवहन उपक्रम ( डढण ) तसेच खासगी इलेक्ट्रिक बसेस (एम३, एम६) प्रकारातील-वरील वाहनांना राज्यातील ठराविक महामार्ग व मार्गावरील टोल नाक्यांवरून टोल कर भरण्यापासून सूट राहील. ही सूट दिनांक २२ ऑगस्ट २०२५ च्या मध्यरात्री पासून लागू झाली आहे.

## हाय सिक्युरिटी नंबर प्लेट असणाऱ्यांसाठी मोठी बातमी! रोज भरावा लागणार १०० रुपये दंड

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी:** हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसवण्याची अंतिम म ुदत वाढवण्यात आली आहे. मात्र ज्यांच्याकडे या नंबरप्लेटच्या गाड्या आहेत त्यांना दर दोन वर्षांनंतर पैसे भरावे लागणार आहेत. ते न भरल्यास प्रत्येक दिवसाला दंड आकारण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. तुम च्याकडे तर या नंबरप्लेटची गाडी नाही ना? तुमच्या घरात, मित्र मैत्रिणींकडे जर अशा नंबरप्लेटच्या गाड्या असतील तर त्यांच्यासाठी ही बातमी महत्त्वाची आहे. गाड्यांची संख्या वाढतेय मात्र रोड टॅक्स देण्याची वेळ आली की दुर्लक्ष केलं जात आहे. नियमांना कचऱ्याची टोपली दाखवणाऱ्यांवर आता रोज कारवाई केली जाणार आहे. त्यांना जोपर्यंत रोड टॅक्स भरत नाही तोपर्यंत प्रत्येक दिवसाचा दंड आकारला जाणार आहे. दोन वर्षांपूर्वी नवी कोरी गाडी घेऊन अभिमानाने घराजवळ उभी केलेली गाडी आता तुमच्याच निष्काळजीपणामुळे आर्थिक डोकेदुखी ठरू शकते. बीए सीरिज असलेल्या नंबर प्लेटसाठी रोड टॅक्स वेळेत न भरल्यास दररोज १०० रुपयांचा दंड आणि विलंबानुसार अतिरिक्त रक्कम आकारण्याचा इशारा पुणे आरटीओ विभागाने दिला आहे.

# शरद जोशी यांच्या जयंतीनिमित्त बुलढाण्यात अनोखी दिंडी; पावसातही शेतकऱ्यांचा उत्साह ओसंडला

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** स्वर्गीय शरद जोशी यांच्या जयंतीनिमित्त बुलढाणा शहरात शेतकरी संघटनेच्या वतीने एक आगळीवेगळी दिंडी काढण्यात आली. यामध्ये कार्यकर्त्यांनी शरद जोशी यांची प्रतिमा डोक्यावर घेऊन पावसातही शहरातून मिरवणूक काढली. या दिंडीने संपूर्ण शहराचे लक्ष वेधले.

शरद जोशी हे स्वातंत्र्यानंतरच्या काळातील खरे शेतकरी नेते म्हणून ओळखले जातात. खुल्या अर्थव्यवस्थेचे आणि शेतकऱ्यांच्या स्वाभिमानाचे खंदे पुरस्कर्ते म्हणून त्यांनी आपली वेगळी ओळख







निर्माण केली होती. त्यांच्या विचारांचे स्मरण करून, त्यांना आदरांजली वाहण्यासाठी बुलढाण्यात शेतकरी संघटनेने ही दिंडी काढली होती.

दिंडीदरम्यान कार्यकर्त्यांनी विविध घोषणा दिल्या. "शरद जोशी अमर रहें", "शेतकऱ्यांना न्याय मिळालाच पाहिजे", अशा घोषणांनी शहराचे वातावरण भारावून गेले होते. विशेष म्हणजे, या दिंडीत एका शेतकऱ्याने गळ्यात व हातात हातकड्या घालून सहभाग घेतला होता, ज्याने उपस्थितांचे विशेष लक्ष वेधले.

दिंडीचा समारोप जिल्हाधिकारी कार्यालयासमोर करण्यात आला. याठिकाणी शेतकरी संघटनेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनात शरद जोशी यांनी दिलेला कृषी कृती दलाचा अहवाल तात्काळ अंमलात आणावा, अशी प्रमुख मागणी होती. त्याचबरोबर खुल्या अर्थव्यवस्थेला पर्याय नाही, यावरही भर देण्यात आला.

शेतकरी नेते नामदेव जाधव यांनी सांगितले की, "शरद जोशी यांनी शेतकऱ्यांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी आयुष्य वेचले. आज त्यांची जयंती आम्ही केवळ स्मरण म्हणून नव्हे, तर त्यांच्या विचारांची मशाल पुढे नेण्यासाठी साजरी करत आहोत. कृषी कृती दलाचा अहवाल हा शेतकऱ्यांच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे आणि तो त्वरित अंमलात आणावा ही आमची मागणी आहे." दिंडीत शेतकरी संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पावसाचे आगमन असतानाही शेतकऱ्यांचा उत्साह ओसंडून वाहत होता, हे विशेष.

CMYK

## अमेरिकेला शह देण्यासाठी चीन, रशिया, भारत यांची युती

चीनच्या शांघाय शहरात नुकतीच एक आंतरराष्ट्रीय शिखर परिषद पार पडली. या शिखर परिषदेत अनेक राष्ट्रांचे प्रमुख उपस्थित होते मात्र सर्वांचे लक्ष होते ते जिनिपिंग, पुतिन आणि मोदी या चीन, रशिया आणि भारत या देशांच्या राष्ट्र प्रमुखांकडे. जिनिपिंग, पुतिन आणि मोदी हे तीन नेतेच या शिखर परिषदेत केंद्रस्थानी होते त्याचे कारणही तसेच होते अमेरिकेने भारत आणि चीनवर टाकलेल्या टॅरीफ बॉम्ब नंतर होणारी ही पहिलीच शिखर परिषद होती. चीन आणि भारतावर टाकलेल्या टॅरीफ बॉम्बमुळे चीन आणि भारताचे अमेरिकेशी असलेले संबंध बिघडले आहेत तर रशियाने युक्रेनशी सुरू असलेले युद्ध थांबवावे यासाठी पुतिन आणि ट्रम्प यांच्यात झालेली बैठक फिस्कटली त्यामुळे या दोन्ही देशात देखील तणाव निर्माण झाला त्या पार्श्र्वभूमीवर ही शिखर परिषद खूप महत्वाची मानली जात होती. अमेरिकेला शह देण्यासाठी ही परिषद आयोजित केली असे मानले जात होते त्यामुळे या शिखर परिषदेतून अमेरिकेला कोणता इशारा दिला जाईल याकडे जगाचे लक्ष लागले होते तसा इशारा या शिखर परिषदेतून अमेरिकेला दिलाही गेला. भारत, चीन आणि रशिया हे तिन्ही देश एकत्र आल्याचे या निमित्ताने जगाने पाहिले. भारत आणि रशिया यांची मैत्री तर जगजाहीर आहे आता भारत आणि चीन यांचे देखील संबंध सुधारत आहे. जर हे तीन देश एकत्र आले तर अमेरिकेला शह देतील असा इशारा या निमित्ताने दिला गेला आणि तो अमेरिकेपर्यंत पोहचला देखील म्हणूनच या शिखर परिषदेनंतर अमेरिकेने भारतावर टीका केली. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड टीम यांचे व्यापार विषयक सल्लागार आणि भारताचे विरोधक असलेले पीटर नवारो यांनी शांघाय सहकार्य परिषदेच्या निमित्ताने मोदी, पुतिन आणि जिनिपिंग यांची झालेली भेट त्रासदायक असल्याचे म्हंटले आहे. भारताने चीन आणि रशिया सोबत नव्हे तर अमेरिका, युक्रेन आणि युरोप सोबत असायला हवे असे त्यांनी म्हटले आहे. पीटर नवारो यांच्या या वक्तव्यातून भारताने रशिया आणि चीनशी केलेली युती अमेरिकेच्या मर्मावर बोट ठेवणारी ठरली हे स्पष्ट झाले. नवारो यांच्या या वक्तव्यातून शांघाय शिखर परिषदेचा हेतू सफल झाला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. भारत, चीन आणि रशिया हा त्रिकोण तयार झाल्यास अमेरिकेलाच त्याचा सर्वाधिक त्रास होईल असे जाणकारांनी याआधीच सांगितले आहे. संयुक्त राष्ट्रातील अमेरिकेच्या माजी राजदूत असलेल्या निकी हॅले यांनी आधीच असा इशारा डोनाल्ड ट्रम्प यांना दिला होता तो खरा ठरताना दिसत आहे. आज भारत, रशिया आणि चीन एकत्र येत आहे त्याचा अमेरिकेला पोटशूळ झाला आहे पण याला तेच जबाबदार आहेत. डोनाल्ड ट्रम्प हे आपल्या हेकेखोर स्वभावामुळे अमेरिकेलाच अडचणीत आणत आहे काही कारण नसताना ट्रम्प यांनी भारत आणि चीनवर भरमसाठ टॅरीफ लावले. भारत आणि चीनने विनंती करूनही ट्रम्प यांनी ते कमी केले नाही. त्यांना वाटले भारतावर टॅरीफ लावल्याने भारत झुकेल आणि ट्रम्प सांगेल तसे वागेल. कोणाचे कोणावाचून अडत नाही, प्रत्येक गोष्टीला पर्याय असतो हे ते विसरले. भारताने पर्याय शोधला आणि मग अमेरिकेला जाग आली. आता नवारो म्हणतात मोदींबद्दल माझ्या मनात खूप आदर आहे. मला भारतीय लोक खूप आवडतात. आज मोदी आवडतात म्हणणारे नवारो काही दिवसांपूर्वी मोदी आणि भारतावर टीका करत होते. वास्तविक भारताने अमेरिकेला कायम मित्र मानले. पंतप्रधान मोदी तर ट्रम्प यांना जाहीरपणे माय डिअर फ्रेंड डोनाल्ड असे म्हणत असे पण डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या हेकेखोर स्वभावामुळे भारतासारखा मित्र गमावला. केवळ भारतच नाही तर भारतासारख्या अनेक देशांवर टॅरीफ लावून अमेरिकेने दुखावले आहे. भविष्यात ते देखील अमेरिके विरुद्ध एकत्र आले तर आश्र्चर्य वाटायला नको. ट्रम्प यांच्या या आतातार्इ भूमिकेचा अमेरिकेचे नागरिकही निषेध करत आहे. एकदा नव्हे तर दोनदा ट्रम्प यांच्या धोरणाविरुद्ध अमेरिकन नागरिक रस्त्यांवर उतरले होते मात्र त्यातूनही ट्रम्प यांनी काही धडा घेतला नाही. त्यांच्या आतातार्इ धोरणामुळे चीन, रशिया, भारत असा नवा त्रिकोण तयार झाला. हा त्रिकोण जर मजबूत झाला तर भविष्यात अमेरिकेला नक्कीच शह देईल यात शंका नाही.

# शिवसेना मुख्यनेते एकनाथराव शिंदे यांची केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी घेतली सदिच्छा भेट

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी:** शिवसेनेचे मुख्यनेते एकनाथराव शिंदे त्यांच्या ठाणे येथील निवासस्थानी जाऊन केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी आज सदिच्छा भेट घेतली .तसेच लालबागचा राजा श्री गणेशाचे मनोभावे दर्शन घेवुन सर्व जनतेला चांगले निरोगी आयुष्य दे असे साकडे घातले

केंद्रीय आयुष ( स्वतंत्र प्रभार ) आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव हे २ सप्टेंबरला मुंबई दौऱ्यावर असताना त्यांनी शिवसेनेचे मुख्यनेते



एकनाथजी शिंदे यांची ठाणे येथील निवासस्थानी जाऊन सदिच्छा



लालबागच्या राजा श्री गणरायांचे केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी घेतले दर्शन

भेट घेतली या दोन्ही नेत्यामध्ये देशासंह राज्यातील आयुष आणि आरोग्य कुटुंब कल्याण विभागाच्या विविध महत्त्वाच्या विषयावर सविस्तर चर्चा झाली .यावेळी युवासेना सहसचिव तथा जिल्हाप्रमुख ऋषी जाधव,ठाणे महानगरपालिकाचे माजी नगरसेवक .संजय सोनार व पदाधिकारी उपस्थित होते. तसेच मुंबई शहरातील लालबागचा राजा श्री गणरायाचे दर्शन ही केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी घेतले लालबागच्या राजा चरणी नतमस्तक होतानाच सर्व जनतेला चांगले निरोगी आरोग्य दे असे साकडे श्री गणराया चरणी घातले.

## नागरे महाविद्यालयात रानमेवा फळभाज्यांचे प्रदर्शन संपन्न

**दैनिक आपला विदर्भ**

**■ देवानंद सानप**

**बिबी :** स्थानिक दुसरबीड दि ०३ येथील नारायणराव नागरे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व वनस्पती शास्त्र विभागाच्या वतीने रानमेवा फळभाज्यांचे प्रदर्शनाचे आयोजित करण्यात आले होते या प्रदर्शनाचे उद्घाटन मा. तोतारामजी कायंदे साहेब (अध्यक्ष भगवान बाबा प्रसारक मंडळ रुम्हना तथा माजी आमदार सिंदखेड राजा) यांच्या हस्ते करण्यात आले त्यांनी विद्यार्थ्यांना रानातील फळभाज्यांविषयी माहिती असलेल्या फळभाज्यांचे शरीरासाठी आवश्यक असणारी ऊर्जा निसर्गाने ऋतूनुसार रान फळभाज्यांची निर्मिती केल्याचे त्यांनी म्हटले आहे यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर विजय नागरे सर आधीसभा तथा व्यवस्थापन परिषद सदस्य संत गाडगेबाबा अमरावती यांनी रानमेवा फळभाज्या कार्यक्रमाचे आयोजन करण्या पाठीमागील महाविद्यालयाची भूमिका स्पष्ट करत असताना दिवसें दिवस रान फळभाज्यांचा दुर्मिळ होत आहे त्याविषयी विद्यार्थ्यांना आकलन व्हावे व त्या फळभाज्यांचा संवर्धन करावे याकरिता विद्यार्थ्यांना फळभाज्या रानातून आणण्याचे सांगण्यात आले होते विद्यार्थ्यांनी कंटुले, वाघाटे, झीटूलीची फुले, फांदाची भाजी चिऊळ तरवटा ,पाथरीची भाजी आशा विविध स्वरूपाच्या दुर्मिळ फळभाज्या विद्यार्थ्यांनी आणल्या व त्याचे शरीरासाठी उपयोग काय आहे याविषयी सुद्धा चर्चा करण्यात आली व त्या भाज्या कशा बनवल्या पाहिजेत याविषयी विद्यार्थिनींनी त्याची रेसिपी सांगितली या प्रदर्शनातून विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद बघून निश्चितच या फळभाज्या जतन करण्यासाठी विद्यार्थी प्रेरणा घेतील आणि या दुर्मिळ फळभाज्या जतन करतील अशी आशा व्यक्त केली या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. मिलिंद गवई प्रा. नयना गवारे प्रा. दीपक देशमाने प्रा.गणेश घुगे प्रा.सत्यम श्रीवास्तव प्रा.भगवान शिंदे प्रा. सुधाकर तारे प्रा. शंकर महेर प्रा.राम पोखरकर प्रा. देवानंद नागरे



प्रा. शेख युनूस गजानन मुंडे अनिल रनमळे यांनी रानमेवा फळभाज्या प्रदर्शन यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांना फळभाज्या आणण्यासाठी प्रेरित केले व दुर्मिळ फळभाज्या रानामध्ये कोठे मिळतात याविषयी मुलांना याविषयी माहिती दिली व प्रदर्शन यशस्वी केले या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# गडांचा राजा : राजगड

**संजय डी.ओरके**
विभागीय संपर्क अधिकारी,
माहिती व जनसंपर्क
महासंचालनालय,
मंत्रालय, मुंबई


सह्याद्रीच्या उंच डोंगररांगांच्या कुशीत उभा असलेला, भव्यता आणि ऐतिहासिक वैभव यांचा अद्वितीय संगम म्हणजे राजगड! छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्याच्या उभारणीतील पहिला भक्कम पाया या गडाने घातला. तब्बल पंचवीस वर्षे स्वराज्याची राजधानी म्हणून राजगडाने अनेक ऐतिहासिक घटना, शौर्यगाथा, राजकीय निर्णय आणि युद्धांचा साक्षीदार होण्याचा मान मिळवला. मराठ्यांच्या पराक्रमाला व स्वराज्याच्या कर्तृत्वाला दिशा देणारा हा गड, केवळ एक किल्ला नसून स्वराज्याच्या आत्म्याचे मूर्तिमंत प्रतीक आहे.

राजगड किल्ल्यावर पोहोचण्याचा प्रवास रोमांचकारी आहे. दाट जंगलातून जाणाऱ्या पायवाटा, खडतर चढण आणि सह्याद्रीच्या निसर्गसौंदर्याचा आनंद यामुळे हा प्रवास अविस्मरणीय ठरतो. गडावर पोहोचल्यानंतर दिसणारे विस्तीर्ण पर्वत आणि खोल दऱ्यांचे विहंगम दृश्य थकवा दूर करून मन भारावून टाकते. इतिहास, साहस आणि निसर्ग यांचा अद्भुत संगम राजगडावर अनुभवता येतो. हा किल्ला केवळ एक पर्यटनस्थळ नाही, तर मराठ्यांच्या गौरवशाली इतिहासाचे दार आहे. इथली शांतता, प्राचीन वास्तू आणि डोंगरमाथ्यावर वाहणारा गार वारा प्रत्येकाला पुन्हा-पुन्हा येथे येण्यासाठी प्रेरित करतो.

### प्राचीन इतिहास

आजचा राजगड किल्ला मुळात ''मुरुंबदेव'' या नावाने ओळखला जात होता. विविध राजवटींच्या अखत्यारीत असताना या ठिकाणी फक्त बालेकिल्ल्याचा भाग अस्तित्वात होता. परंतु इ.स. १६४३ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी हा किल्ला ताब्यात घेताच त्याचे पुनर्निर्माण सुरू झाले. तेव्हाच या गडाला ''राजगड'' म्हणजेच गडांचा राजा हे साजेसे नाव लाभले आणि स्वराज्याची राजधानी म्हणून तो घोषित करण्यात आला.

या गडावर अनेक ऐतिहासिक घटना घडल्या. इथेच शिवाजी महाराजांचे सुपुत्र राजाराम यांचा जन्म झाला. त्यांची पत्नी सईबाई यांचे याच ठिकाणी दुःखद निधन झाले. १६६४ मध्ये सूरत लुटल्यानंतर मिळालेल्या संपत्तीचे संरक्षण याच गडावर करण्यात आले. छत्रपती



शिवाजी महाराजांनी अनेक महत्त्वाच्या लढायांची रणनीती राजगडावर आखली. भक्कम तटबंदी, मजबूत बुरुज आणि चतुराईने बांधलेल्या रचना यामुळे हा किल्ला अभेद्य बनला. मुघल आणि आदिलशाही सैन्याने कित्येक वेळा किल्ला जिंकण्याचा प्रयत्न केला.

आजही राजगड हा इतिहास, साहस आणि निसर्ग सौंदर्याचा संगम आहे. पर्यटनासाठी हा किल्ला एक उत्तम ठिकाण आहे. किल्ल्यावरील सुवेळा माची, संजीवनी माची आणि बालेकिल्ला ही विशेष आकर्षणाची ठिकाणे. राजगडावरून दिसणारे सह्याद्रीचे डोंगर आणि धुके भरलेले निसर्गदृश्य मन मोहून टाकतात. इतिहासप्रेमी, साहसिक पर्यटक आणि निसर्गप्रेमी यांच्यासाठी राजगड एक अनोखा अनुभव देणारे ठिकाण आहे.

### नैसर्गिक रचना आणि संरक्षण व्यवस्था

राजगड किल्ला मध्ययुगीन स्थापत्यकलेचा अद्वितीय नमुना आहे. सुमारे ४० किलोमीटर परिघ असलेल्या या किल्ल्याची समुद्रसपाटीपासून उंची १३७६ मीटर आहे. भक्कम तटबंदी आणि सुयोग्य रचना यामुळे हा किल्ला संरक्षण आणि प्रशासनासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरला.

या किल्ल्याचा मध्यभाग पद्मावती माची म्हणून ओळखला जातो. येथे छत्रपती शिवाजी महाराजांचे निवासस्थान होते. पद्मावती देवीचे मंदिर, पद्मावती तलाव आणि राजवाड्याचे अवशेष येथे पाहायला मिळतात. ही माची केवळ निवासासाठीच नव्हे, तर सैन्याच्या हालचालींसाठीही अत्यंत महत्त्वाची होती.

किल्ल्याच्या पश्चिमेला संजीवनी माची आहे. येथे तीन स्तरांमध्ये बांधलेली तटबंदी आजही मराठ्यांच्या लढाऊ कौशल्याची साक्ष देते. शत्रूच्या हल्ल्यांपासून संरक्षण करण्यासाठी ही संरचना अत्यंत उपयुक्त ठरली. पूर्व बाजूला सुवेळा माची आहे. येथून दिसणारे निसर्गसौंदर्य विलोभनीय आहे. याच ठिकाणी ''नेढे'' नावाची मोठी नैसर्गिक दगडी कमान आहे. हा भूशास्त्रीय चमत्कार किल्ल्याच्या सौंदर्यात भर घालतो. बालेकिल्ल्यावरून सह्याद्री पर्वतरांगेचे अप्रतिम दृश्य दिसते. पूर्वी येथे राजवाडा होता आणि याच ठिकाणी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले जात असत.

राजगडाची भौगोलिक व लष्करी रचना अतिशय अद्वितीय आहे. किल्ला डोंगरांच्या उंचसखल उतारांवर बांधलेला असल्याने तो जिंकणे जवळजवळ अशक्य होते. एका सरळसरळ तटबंदीवर अवलंबून न राहता तीन प्रमुख माच्या पद्मावती, संजीवनी आणि सुवेळा या गडाला त्रिसूत्री स्वरूपात जोडलेल्या आहेत. या प्रत्येक माचीचा आपापला वेगळा उपयोग होता :

पद्मावती माची गडाचे हृदय मानली जाणारी ही माची प्रशासनिक व निवासी केंद्र होती. येथे राजसदर, पद्मावती देवीचे मंदिर, महाराजांचे निवासस्थान, राणीवसा तसेच मंत्र्यांचे निवासस्थान यांचा समावेश होता. मोठमोठ्या पाण्याच्या टाक्यांमुळे या माचीवर वर्षभर पाणी उपलब्ध असे.

संजीवनी माची पश्चिमेकडे पसरलेली ही माची मजबूत तटबंदी, अर्धगोलाकार बुरुज आणि पहारेकऱ्यांसाठी सोयीस्कर स्थानांनी युक्त होती. संरक्षण आणि आक्रमण अशा दोन्ही दृष्टींनी ती अत्यंत महत्त्वाची मानली जात असे.

सुवेळा माची पूर्वेकडे असलेली ही माची अरुंद व उग्र कड्यांवर पसरलेली आहे. येथे पाण्याची टाकी, पहारेकऱ्यांची ठाणी आणि गुप्त, अरुंद प्रवेशद्वार होते. शत्रूवर लक्ष ठेवण्यासाठी हे स्थान अनन्यसाधारण उपयोगी ठरत असे.

या तिन्ही माच्या एका ठिकाणी येऊन मिळतात तो म्हणजे बालेकिल्ला. उंच मनोरे, भक्कम भिंती आणि विस्तीर्ण परिसरावर नजर ठेवणारा हा भाग म्हणजे गडाचा सर्वोच्च आणि अंतिम संरक्षणस्तर. गडाच्या प्रवेशासाठी पाली, गुंजवणे व अळू दरवाजा हे मार्ग वापरले जात. तसेच खडकात कोरलेल्या असंख्य टाक्यांमुळे पाणी व धान्यसाठा अखंड उपलब्ध राहावा याची काळजी घेण्यात आली होती.

### गडाचे वैशिष्ट्य

राजगडाच्या बांधणीत केवळ संरक्षणाचा विचार केलेला नव्हता, तर राजकारण, प्रशासन, सैनिक व्यवस्थापन आणि दीर्घकालीन टिकाऊपणा या सर्व बाबी लक्षात घेऊन गड उभारण्यात आला. वळणावळणाच्या पायवाटा, धान्यकोठारे, पहारेकऱ्यांच्या चौक्या यामुळे गड एक परिपूर्ण राजधानी ठरला.

### सांस्कृतिक वारसा

आजचा राजगड हा फक्त एक पुरातन अवशेष नाही, तर जिवंत वारशाचे प्रतीक आहे. येथे होणारे उत्सव गडाच्या ऐतिहासिक महत्त्वाची आठवण करून देतात. दिवाळीच्या वेळी होणारा दीपोत्सव संपूर्ण गडाला दिव्यांच्या उजेडात न्हाऊ घालतो. शिवजयंतीच्या दिवशी तर हजारो लोक गडावर जमतात. पारंपरिक वाद्ये, भाषणे, शिवचरित्रावर आधारित नाटिका यामुळे गड पुन्हा एकदा इतिहासाच्या सोनेरी क्षणात जगू लागतो.

### जागतिक ओळख

इतिहास, वास्तुकला, युद्धतंत्र आणि सांस्कृतिक महत्त्व यांचा अनोखा संगम असलेला राजगड आज युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या मालिकेत समाविष्ट होऊन भारताचे आणि मराठ्यांचे वैभव जगभर पोचवत आहे. राजगड किल्ला केवळ ऐतिहासिक वारसा नाही, तर तो एक साहस, एक प्रवास आणि मराठ्यांच्या अदम्य शौर्याला वाहिलेली आदरांजली आहे. येथील प्रत्येक दगड भूतकाळाच्या कथा सांगतो. इतिहासप्रेमींना येथे मराठ्यांच्या विजयगाथांचा अनुभव येतो. ट्रेकिंगच्या चाहत्यांसाठी हा किल्ला एक रोमांचक आहे. निसर्गप्रेमींना येथे सह्याद्रीच्या भव्य सौंदर्याचे दर्शन होते. येथील शांतता आणि वारा मनाला ताजेतवाने करतो.

राजगड महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाची आठवण करून देतो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या दूरदृष्टीचे आणि पराक्रमाचे साक्षीदार असलेला हा किल्ला आजही दिमाखात उभा आहे. येथे आल्यावर प्रत्येक क्षण संस्मरणीय वाटतो. एकदा का तुम्ही येथे पोहोचलात, तर हा प्रवास केवळ एक ट्रेक राहणार नाही, तर तो एक ऐतिहासिक अनुभव बनून हृदयात कोरला जाईल. राजगड तुमची वाट पाहतो आहे, चला निघा ''गडांच्या राजाला'' भेट द्यायला!

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# महाराष्ट्राला जागतिक गुंतवणुकीचे केंद्र बनविण्याचा संकल्प : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## भारतीय विदेश सेवेतील अधिकाऱ्यांशी संवाद

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई /प्रतिनिधी:** महाराष्ट्र हे जागतिक गुंतवणुकदारांसाठी सर्वात आकर्षक 'डेस्टिनेशन' बनविण्याचा शासनाचा संकल्प आहे. भारतीय विदेश सेवेतील सेवा अधिकाऱ्यांकडून मिळालेल्या सूचनांचा विचार करून राज्य शासन विविध क्षेत्रातील बाबींसाठी नवी धोरणे आखेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्षा निवासस्थानी भारतीय विदेश सेवेतील अधिकाऱ्यांसोबत संवाद साधला. यावेळी त्यांनी महाराष्ट्रातील वेगाने बदलणाऱ्या पायाभूत सुविधा, गुंतवणूक संधी आणि राज्याच्या जागतिक स्तरावरील प्रगतीविषयी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, शासन हे केवळ 'स्टेट' म्हणून नव्हे तर एक 'इन्स्टिट्यूशन' म्हणून प्रणाली उभी करण्याचे शासनाचे ध्येय आहे. यामुळे शासनाची कार्यपद्धती व्यक्तीनिष्ठ न राहता संस्थात्मक स्वरूपात उभी राहील आणि शासनाचे निर्णय व कामकाज संस्थात्मक पातळीवर रुजतील व ते कायमस्वरूपी टिकून राहतील.

महाराष्ट्रात १० लाख कोटी रुपयांचे पायाभूत प्रकल्प सुरू आहेत. यात महामार्ग, बंदरे, विमानतळ, वीज प्रकल्प, शहरी विकास आणि पाणीपुरवठा यांचा समावेश आहे.

वाढवण बंदर व समृद्धी महामार्ग यामुळे महाराष्ट्र जागतिक पुरवठा साखळीत क्रांतिकारी बदल घडवणार आहे. 'जेएनपीटी' बंदराची क्षमता संपत आल्याने वाढवण बंदर देशासाठी मोठा पर्याय ठरणार आहे. समृद्धी महामार्गाद्वारे राज्यातील २६ जिल्हे या बंदराशी जोडले जातील, ज्यामुळे लॉजिस्टिक्स खर्च मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होणार असल्याचे श्री. फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, वाढवण येथील परिसरात देशातील पहिले मल्टी-मोडल हब उभे राहणार आहे. येथे पोर्ट, एअरपोर्ट, बुलेट ट्रेन आणि महामार्गाचे संपूर्ण जाळे उपलब्ध असेल. या भागात चौथी मुंबई तयार होत आहे. त्याचबरोबर नवी मुंबईत युनिव्हर्सिटी टाउनशिप, स्पोर्ट्स सिटी, मेडिसिटी आणि इनोव्हेशन सिटी विकसित करण्यात येत आहेत.

औद्योगिक गुंतवणुकीबाबत मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्रात देशातील ३०% उत्पादन होते. आता पुणे, नागपूर, विदर्भ आणि मराठवाड्यात नवी औद्योगिक केंद्रे उभारत असल्याने राज्य संपूर्णपणे औद्योगिक नकाशावर अग्रगण्य ठरेल. नागपूरमध्ये डिफेन्स मॅन्युफॅक्चरिंग आणि सोलर हब, तर विदर्भात गडचिरोली येथे स्टील हब उभे राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

शाश्र्वत विकासाबाबत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सन २०३० पर्यंत महाराष्ट्राच्या ऊर्जा वापरात ५२ टक्के हरित ऊर्जा असेल. सौर, पवन, हायड्रोजन व पंप स्टोरेज यावरही भर देण्यात येत असून सार्वजनिक वाहतूकही संपूर्णपणे नूतनीकरणीय ऊर्जेवर नेण्याचा प्रयत्न आहे. अध्यात्मिक पर्यटन (स्पिरिचुअल टुरिझम) आणि सागरीतटीय पर्यटन (कोस्टल टुरिझम) यांना चालना देण्यासाठी शक्तिपीठ महामार्गासारखे प्रकल्प हाती घेतले असल्याचेही त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणाऱ्या भारतीय विदेश सेवेतील श्रीमती योजना पटेल (डीपीआर, पीएमआय न्यूयॉर्क), श्रीमती प्रतिभा पारकर-राजाराम, संयुक्त सचिव (संसद व समन्वय), श्रीमती परमिता त्रिपाठी, संयुक्त सचिव (ओशेनिया व आयपी), अंकन बॅनर्जी, संयुक्त सचिव (डीई), श्रीमती स्मिता पंत, राजदूत, एल सॅल्वाडोर, बिष्वदीप डे, उच्चायुक्त, टांझानिया आणि सी. सुगंध राजाराम, संयुक्त सचिव (बिम्सटेक व सार्क) यांचा समावेश होता.


## महत्त्वाचे...

### धडा वेगळे शिर असलेल्या महिलेच्या हत्येचा उलगडा; भोईवाडा पोलिसांची यशस्वी कामगिरी




दैनिक आपला विदर्भ

**भिवंडी/प्रतिनिधी:** भिवंडी शहरातील खाडी लगतच्या ईदगाह झोपडपट्टी जवळील दलदलीत ३० ऑगस्ट रोजी धडा वेगळ्या आढळलेल्या महिला शिर आढळून आल्या नंतर या महिलेची हत्या केलेल्या गुन्ह्याचा उलगडा करण्यात स्थानिक भोईवाडा पोलिसांना यश मिळाले आहे. पोलिसांनी अवघ्या २४ तासात हत्या झालेल्या महिलेची ओळख पटवून ४८ तासात हत्या करणाऱ्या पतीस अटक करण्यात यश मिळवले आहे. परवीन उर्फ मुस्कान वय २६ असे हत्या झालेल्या महिलेचे नाव असून या गुन्ह्यात पती तहा इम्तियाज अन्सारी याला अटक केली आहे.



ईदगाह झोपडपट्टी जवळील खाडी लगतच्या दलदलीत ३० ऑगस्ट रोजी धडा वेगळे महिलेचे शिर आढळल्याने एकच खळबळ उडाली होती. तर महिलेची ओळख पटवणे व त्यानंतर हत्येचा आरोपी पकडणे असे मोठे आव्हान भोईवाडा पोलिसांसमोर होते. भोईवाडा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अशोक रत्नपारखी यांसह वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक प्रमोद कुंभार व त्यांच्या पोलिस पथकातील पोलिसांनी ईदगाह झोपडपट्टीत माहिती घेण्यास सुरवात केली. त्यामध्ये येथील एक महिला दिसत नसल्या बद्दल माहिती समोर आली. त्यामुळे पोलिसांनी तपासाची दिशा निश्चित करीत चौकशीस सुरवात केली. त्यामध्ये परवीन उर्फ मुस्कान या महिलेचा तो मृतदेह असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर माहिती घेतली असता तिचा पती घरी नसल्याचे आढळून आले.

पोलिसांनी शोध घेत त्यास १ सप्टेंबर रोजी सायंकाळी ताब्यात घेऊन कसून चौकशी सुरू केली. त्यानंतर पती तहा याने पत्नीच्या हत्येची कबुली दिली आहे. पोलिसांनी त्यास घटनास्थळी नेऊन हत्या केलेल्या पत्नीचे धड कुठे आहे, त्याबाबत शोध घेण्यासाठी खाडी पात्रात बोटीच्या सहाय्याने शोध घेण्याचा प्रयत्न केला.

### डोणगावात मच्छरांचा उपद्रव शिगेला; रहिवाशांची धूरफवारणीसाठी ग्रामपंचायतीकडे मागणी



दैनिक आपला विदर्भ

**मेहकर /तालुका प्रतिनिधी:** डोणगाव गावात सध्या मच्छरांचा मोठ्या प्रमाणात उपद्रव सुरू असून यामुळे डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया यांसारख्या साथीचे आजार पसरण्याचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. विशेषतः लहान मुले, शालेय विद्यार्थी आणि वृद्ध नागरिक यांना याचा मोठा त्रास होत असून गावकऱ्यांमध्ये आरोग्याच्या दृष्टीने चिंतेचं वातावरण निर्माण झालं आहे.

गावातील वाढत्या आरोग्यधोक्याच्या पार्श्वभूमीवर रहेमतिया सोशल ग्रुप तर्फे ग्रामपंचायतीकडे धूरफवारणी करण्याची तातडीची मागणी करण्यात आली आहे. या मागणीसंदर्भात ग्रामविकास अधिकारी व सरपंच यांना लेखी निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, ''गावातील वातावरण पूर्णतः दूषित झाले असून मच्छरांची संख्या झपाट्याने वाढली आहे. यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत आणि विविध आजारांचा धोका वाढला आहे. ग्रामपंचायतीने तात्काळ धूरफवारणी मोहीम हाती घ्यावी, जेणेकरून गाव पुन्हा स्वच्छ, निरोगी आणि सुरक्षित राहील.''

निवेदन सादर करताना रहेमतिया सोशल ग्रुपचे अध्यक्ष ज़ैनुल आबेदीन शेख, तसेच आवेज़ खान पठाण, उस्मान कुरैशी, अतीक खान, इरशाद खान, शहानुर खान, शेख शोएबोदिन, हमीद खान, साहिल खान आदी पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

गावकऱ्यांनी ग्रामपंचायतीकडून लवकरात लवकर कारवाई करून मच्छरांचा बंदोबस्त करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

# अभिनेत्री पूनम पांडेचा मराठमोळा लूक, बाप्पाच्या दर्शनासाठी आल्यानंतर मराठीत संवाद साधला

**मुंबई/प्रतिनिधी:** आपल्या बोल्ड कपड्यांमुळे नेहमी वादात सापडणारी बॉलिवूड अभिनेत्री पूनम पांडे यावेळी पूर्णपणे वेगळ्या अंदाजात दिसली. गणेशोत्सवानिमित्त बाप्पाच्या दर्शनासाठी ती मराठमोळ्या पारंपरिक वेशभूषेत आलेली पाहायला मिळाली. तिचा हा साधा, पारंपरिक अवतार पाहून चाहत्यांनी आश्चर्य व्यक्त केले.

पूनमने साडी नेसून, पारंपरिक दागिने परिधान करून बाप्पाचे दर्शन घेतले. यावेळी माध्यमांशी बोलताना तिने मराठीत संवाद साधला. ''बाप्पाने बोलवलंय, खूप मोठी गोष्ट आहे. सर्वजण हळूहळू या. गणपत्ती बाप्पा मोरया..!,'' असं पूनम पांडे यावेळी बोलताना म्हणाली.

साधारणपणे बोल्ड इमेजमुळे नेहमी सोशल मीडियावर चर्चेत राहणारी पूनम, यावेळी मात्र तिच्या मराठमोळ्या लूकमुळे चर्चेत आली आहे. तिचा हा व्हिडीओ काही तासांतच व्हायरल झाला असून, नेटिझन्सकडून मिश्र प्रतिक्रिया मिळत आहेत. काहींनी तिच्या साधेपणाचे कौतुक केले, तर काहींनी याला ''इमेज बदलण्याचा प्रयत्न'' असे म्हटले. मात्र, पूनम पांडेने पारंपरिक अवतारात बाप्पाचे दर्शन घेतल्याने तिचा हा लूक चर्चेचा विषय ठरत आहे.

गणेशोत्सवाच्या काळात भक्त बाप्पाच्या भक्तीत तल्लीन झाले आहेत. अनेक कलाकारांनी गणेशोत्सवादरम्यान गणपती बाप्पाचे दर्शन घेतलेले पाहायला मिळाले. दरम्यान, मुंबईतील लालबागच्या राजाच्या दर्शनासाठीही सेलिब्रिटींची वारी सुरूच आहे. आज, बुधवारच्या दिवशी अभिनेत्री ईशा देओल लालबागच्या राजाच्या दर्शनासाठी पोहोचली आणि बाप्पाचे आशीर्वाद घेतले. तिच्यासोबतच तारक मेहता मालिकेतून प्रसिद्ध झालेली दिशा वकानी आणि अभिनेत्री पूनम पांडेही मराठमोळ्या लूकमध्ये सजून बाप्पाचे दर्शन घेण्यासाठी हजर झाल्या.

हेमा मालिनी आणि धर्मेंद्र यांची कन्या, अभिनेत्री ईशा देओल बाप्पाच्या दर्शनासाठी पोहोचली. ईशा ही साऊथ अभिनेत्री मधुच्या सोबत लालबागच्या राजाचे दर्शन घेण्यासाठी आली होती. सोशल मीडियावर समोर आलेल्या व्हिडिओत दोघीही एकत्र दर्शनाला जाताना दिसतात. दोन्ही अभिनेत्री चालत मंदिरापर्यंत पोहोचल्या. मधु साडीमध्ये दिसली.

### खात्यांतर्गत पिएसआय होण्याचा मार्ग मोकळा, फौजदार पदासाठी २५ टक्के आरक्षणासह विभागीय परीक्षा पुन्हा सुरु

**मुंबई/प्रतिनिधी:** राज्यातील पोलिस अंमलदारांसाठी मोठी बातमी आहे. शासनाने पोलिस उपनिरीक्षक पदासाठीची खातेअंतर्गत विभागीय परीक्षा पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. फेब्रुवारी २०२२ मध्ये बंद करण्यात आलेली ही परीक्षा आता पुन्हा सुरू होणार असल्याने मेहनती आणि अनुभवी पोलिस कर्मचाऱ्यांना अधिकारी होण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे.या परीक्षेमुळे कमी वयातच पदावर पदोन्नती मिळून पोलिस दलात तरुण आणि ऊर्जावान अधिकारी दीर्घकाळ कार्यरत राहू शकतील. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे हजारो पोलिस कर्मचाऱ्यांचे करिअर नव्या उमेदीने पुढे जाण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी एप्रिल २०२५ मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून पोलिस उपनिरीक्षक पदासाठीची खातेअंतर्गत विभागीय परीक्षा पुन्हा सुरू करण्याची मागणी केली होती. पूर्वी किमान पाच वर्षांची सेवा पूर्ण केलेल्या पोलिस अंमलदारांना पदासाठी २५ टक्के आरक्षणाच्या अंतर्गत विभागीय परीक्षा देता येत होती. या माध्यमातून अनेक मेहनती व अनुभवी पोलिस कर्मचाऱ्यांना अधिकारी होण्याची सुवर्णसंधी मिळत होती.

# परळीत बुलेटच्या कर्णकर्कश आवाजावर पोलिसांचा बुलडोझर!

### ४९ सायलेन्सर जप्त; रस्त्यावर ठेवून थेट नष्ट केले, शहरवासीयांच्या तक्रारींनंतर विशेष मोहीम राबवून कारवाई; नियमभंग करणाऱ्या युवकांना पोलिसांचा कडक इशारा

दैनिक आपला विदर्भ

**परळी/प्रतिनिधी:** परळी शहरात गेल्या काही महिन्यांपासून बुलेट मोटारसायकलच्या कर्णकर्कश आवाजामुळे नागरिक हैराण झाले होते. या त्रासदायक आवाजाविरोधात नागरिकांकडून वारंवार तक्रारी केल्या जात होत्या. विशेषतः रात्रीच्या वेळेस ध्वनिप्रदूषण वाढवणाऱ्या आणि जनतेच्या शांततेचा भंग करणाऱ्या या बुलेटधारकांविरोधात पोलिसांनी आता थेट मोठी कारवाई करत उदाहरण सेट केलं आहे.

**पोलिसांची विशेष मोहीम**

परळी शहर पोलीस निरीक्षक रघुनाथ नाचर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई राबवण्यात आली. यामध्ये शहरातील विविध भागांमधून ध्वनिप्रदूषण करणाऱ्या ४९ बुलेट मोटारसायकलचे मॉडिफाइड सायलेन्सर जप्त करण्यात आले. हे सायलेन्सर कायद्याच्या विरोधात बदलण्यात आले होते, ज्यामुळे त्यांच्या आवाजाचा स्तर अत्यंत कर्णकर्कश झाला होता.

**बुलडोझरने सायलेन्सर नष्ट करून कठोर संदेश**

सायलेन्सर जप्त केल्यानंतर, पोलिसांनी थेट पोलीस ठाण्याच्या बाहेरील रस्त्यावर हे सर्व सायलेन्सर ठेवून बुलडोझर चालवला. या दृश्यामुळे एकप्रकारे संपूर्ण शहरात पोलीस प्रशासनाचा स्पष्ट संदेश गेला की, अशा गैरकृत्यांना माफी नाही.

**शहरवासीयांमध्ये समाधान**

या कारवाईनंतर शहरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. अनेकांनी सोशल मीडियावरही पोलीस दलाचे आभार मानले असून, अशा प्रकारच्या कडक पावले उचलली जात असल्याने ध्वनिप्रदूषण रोखण्यास मदत होईल, असे मत व्यक्त करण्यात आले.

**युवकांना इशारा**

पोलीस निरीक्षक रघुनाथ नाचर यांनी सांगितले की, ''ध्वनिप्रदूषण करणाऱ्या वाहनांवर कारवाई सुरूच राहणार आहे. युवकांनी अशा चुकीच्या पद्धतीने वाहनांमध्ये बदल करू नयेत. जर कोणी नियमभंग करत असेल, तर त्याच्यावर कठोर कारवाई केली जाईल.''

**कायदेशीर बाजू**

वाहनधारकांनी कोणताही सायलेन्सर किंवा वाहनात असा बदल करू नये, जो केंद्रीय मोटार वाहन कायद्याच्या विरोधात आहे. असे मॉडिफिकेशन्स केल्यास वाहन जप्तीपासून दंडात्मक कारवाई होऊ शकते.

# जिल्ह्यात १५ ते ३० सप्टेंबर दरम्यान गोवर-रुबेला विशेष लसीकरण मोहीम

### सर्व आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे लसीकरण करा- जिल्हाधिकारी यांचे निर्देश

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** आरोग्य विभागामार्फत राज्यातील सर्व आश्रमशाळांमध्ये गोवर व रुबेला प्रतिबंधात्मक विशेष लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने १५ ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत जिल्ह्यातील सर्व आश्रमशाळांमधील पात्र विद्यार्थ्यांना गोवर व रुबेला लस दिली जाणार आहे. यासाठी आरोग्य अधिकारी व प्रशासनाची पूर्ण तयार झाली असून लसीकरणापासून कोणताही विद्यार्थी वंचित राहणार नाही, याची दक्षता संबंधितानी घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिले.


जिल्हाधिकारी कार्यालय येथे नुकतीच जिल्हा लसीकरण टास्क फोर्स समिती, जिल्हा गुणवत्ता आश्वासन समिती तसेच पंतप्रधान जन आरोग्य योजना अंतर्गत आयुष्मान भारत कार्ड संदर्भात आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गीते, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. बिराजदार, जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ. मिलींद जाधव, निवासी वैद्यकीय अधिकारी प्रवीण घोंगटे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.रणजीत मंडाले, सर्व तालुका आरोग्य अधिकारी तसेच शिक्षण विभाग, महिला व बालकल्याण विभाग, अल्पसंख्यांक विभाग, आदिवासी विभाग यांसह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत जिल्ह्यातील सर्व आश्रमशाळा व मदरशांमधील विद्यार्थ्यांच्या याद्या तयार करणे, आवश्यक मनुष्यबळाची नियुक्ती, प्रशिक्षण तसेच सूक्ष्म कृती आराखड्याचे नियोजन अशा विविध विषयाचा आढावा घेऊन जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक तसेच नगरपालिका आरोग्य अधिकाऱ्यांना आवश्यक ती तयारी करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले. या विशेष मोहिमेमुळे विद्यार्थ्यांना गोवर व रुबेला सारख्या गंभीर आजारांपासून संरक्षण मिळणार असून, राज्यातील मुलांचे आरोग्य सुदृढ व सुरक्षित होण्यास मोठी मदत होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त केला.

# गौरी गणपती च्या मखरा मधे निघाला अतिशय विषारी मण्यार साप

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप





**बिबी :** लोणार तालुक्यातील पिंपळनेर येथील रहिवासी अश्विन सानप यांच्या घरी गौरी गणपती च्या मखर मध्ये हा साप आढळला असता त्यांनी तत्काळ 'मी लोणारकर' टीम सदस्य सर्पमित्र सचिन कापुरे व सर्पमित्र कमलेश आगरकर याना कळविले ते ही लगेच त्या ठिकाणी पोचले प्रथम साप कोणता आहे याची पाहणी केली असता निदर्शनास आले की हा अत्यंत विषारी असा मण्यार प्रजातीचा साप आहे. घरात पाहुण्यांची रेलचेल होती त्यातून हा साप व्यवस्थित रेस्क्यू केला व घरच्यांना विचारणा केली कुणाला दंश तर झाला नाही कारण याचे दात अतिशय छोटे असतात पण आनंदाची बातमी की ही हानी नक्कीच टळली. सर्पमित्र विनय कुलकर्णी यांनी या परिवाराला असे झाल्यास घ्यायची काळजी सांगितली. सचिन कापुरे व कमलेश यांनी या सापाला पकडून त्याला त्याच्या नैसर्गिक अधिवासात सोडले व त्याला ही जीवदान दिले . मण्यार हा भारतातील चार प्रमुख विषारी सापांपैकी एक आहे, याचा रंग पोलादी निळा असून अंगावर पांढरे पट्टे किंवा खवले असतात. हा साप अतिशय विषारी असून रात्रीच्या वेळी जास्त सक्रिय असतो आणि जंगलात राहणे पसंत करतो. दिवसा हा साप आढळ्याने सर्पमित्र कुतूहल व्यक्त करत आहेत या प्रसंगी पिंपळनेर येथील महिला, मुले आणि मोठ्या संख्येने गावकरी जमले होते.

# ‘राष्ट्रीय आयुष मिशन आणि राज्यांतील क्षमता विकास’ या विषयावरील विभागीय परिषदेचे अखिल भारतीय आयुर्वेद संस्थान, नवी दिल्ली येथे झाले उद्‌घाटन





दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** आयुर्वेदाला अधिक बळकट करण्यासाठी राज्यनिहाय आराखडे व मानक कार्यपद्धती तयार करणे गरजेचे असल्याचे मत केंद्रीय आयुष ( स्वतंत्र प्रभार )आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी व्यक्त केलाय

नवी दिल्ली येथील सरिता विहार येथे अखिल भारतीय आयुर्वेद संस्थेत आयोजित ‘राष्ट्रीय आयुष अभियान आणि राज्यांतील क्षमता विकास’ या विभागीय परिषदेचे उद्घाटन आज ३ सप्टेंबरला झाले त्यावेळी अध्यक्ष भाषणात आपलं मनोगत व्यक्त करताना केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव बोलत होते या दोन दिवसीय शिबिराच्या उद्घाटन कार्यक्रमाला निती आयोगाचे सदस्य डॉ. विनोद कुमार पॉल आणि आयुष मंत्रालयाचे सचिव वैद्य राजेश कोटेचा उपस्थितीत होते केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव पुढे म्हणाले की राज्यनिहाय गरजांनुसार सशक्त आणि सर्वसमावेशक आरोग्य आराखडा उभारण्याच्या सरकारच्या बांधिलकीवर भर दिला आहे देशभरातील आरोग्यसेवा अधिक प्रभावी करण्यासाठी सर्वसमावेशक मानक कार्यपद्धती विकसित करण्याच्या सरकार प्रयत्न करत आहे. ‘‘आमचे उद्दिष्ट म्हणजे राज्यनिहाय आराखडे तयार करणे, सर्वसमावेशक विकसित करणे, उत्तम आरोग्य पायाभूत सुविधा उभारणे, लोकांना दर्जेदार सेवा उपलब्ध करून देणे आणि आयुष पद्धतीचे आधुनिक आरोग्य व्यवस्थेशी एकात्मिकरण सुनिश्चित करणे आहे.’’ पंतप्रधानांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली २०१४ मध्ये सुरू झालेल्या राष्ट्रीय आयुष अभियानाच्या प्रगतीचा आढावा घेताना, प्रतापराव जाधव यांनी या अभियानाने परवडणाऱ्या आणि सर्वसमावेशक आयुष आरोग्यसेवेत मोठी प्रगती साधल्याचे नमूद केले. त्यांनी विशेषतः देशभरात उभारण्यात येणाऱ्या १२,५०० आयुष्मान आरोग्य मंदिरांच्या परिवर्तनकारी उपक्रमावर भर दिला.

यामुळे ओपीडी–आधारित सेवांपासून सर्वसमावेशक सेवा वितरण मॉडेलकडे झालेला मूलभूत बदल अधोरेखित झाला असून प्रतिबंधात्मक व प्रोत्साहनात्मक आरोग्यसेवेवर यामध्ये विशेष लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. ते पुढे म्हणाले की, ४ मार्च २०२४ रोजी आयुष मंत्रालयाने आयुष आरोग्यसेवा संस्थांसाठी ‘इंडियन पब्लिक हेल्थ स्टँडर्ड्स’ सुरू केले. हे मानदंड निती आयोग आणि आरोग्य सेवा महानिदेशालय यांच्या सल्लामसलतून विकसित करण्यात आले असून, आयुष क्षेत्रातील पायाभूत सुविधा, मानव संसाधन, क्षमता विकास, औषधे, गुणवत्ता हमी, नैदानिक चाचण्या आणि ब्रँडिंग या सर्व बाबींमध्ये एकसमानता व दर्जा सुनिश्चित करण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल आहे.

**प्रतापराव जाधव यांनी येथे ‘आयुर्विद्या ॲडव्हान्स्ड सेंटर’चे केले उद्घाटन**

आयुर्वेद शिक्षण आणि संवाद यासाठी समर्पित असा एक अग्रगण्य डिजिटल मंच. या केंद्राचा उद्देश म्हणजे तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखालील अभ्यासक्रम, थेट वेबिनार्स आणि संवादात्मक सत्रांद्वारे आयुर्वेद शिक्षण सर्वांसाठी सहज उपलब्ध करणे. हा उपक्रम क्षमता विकास, सतत व्यावसायिक प्रगती आणि आयुष क्षेत्रातील नवकल्पनांना चालना देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल. आयुष परिषदेच्या निमित्ताने उपस्थितांना संबोधित करताना निती आयोगाचे सदस्य (आरोग्य) डॉ. व्ही. के. पॉल यांनी ‘सुदृढ भारत’ घडविण्यात आयुष क्षेत्राच्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर भर दिला. त्यांनी नमूद केले की ही परिषद देशभरातील पारंपरिक आरोग्यव्यवस्था बळकट करण्यासाठी विविध भागधारक आणि राज्य सरकारांना एका व्यासपीठावर आणते. ते म्हणाले की, ‘विकसित भारत २०४७’ या दृष्टीकोनाची पूर्तता फक्त निरोगी आणि उत्पादक जनतेमुळेच शक्य आहे.

यावेळी त्यांनी अधोरेखित केले की, ‘‘आरोग्य हे राष्ट्रीय विकासाचे साधनही आहे आणि एक महत्त्वपूर्ण टप्पाही आहे.’’ डॉ. पॉल यांनी नमूद केले की भारताने तीव्र आजारांवर मात करण्यामध्ये आणि एसडीजी उद्दिष्टे साध्य करण्यामध्ये महत्त्वपूर्ण प्रगती केली आहे. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली क्षयरोग, कुष्ठरोग, लिम्फॅटिक फिलॅरियासिस, गोवर, काळा आजार आणि रुबेला यांसारखे आजार निर्मूलन करण्यासाठी केंद्रित प्रयत्न केले जात आहेत.

डॉ. पॉल यांनी आयुष आणि आधुनिक आरोग्यव्यवस्था या दोन्हींचा समावेश असलेल्या सर्वसमावेशक आणि एकात्मिक दृष्टिकोनातून सध्याची ७१ वर्षांची आयुर्मर्यादा वाढवून ८५ वर्षे किंवा त्याहून अधिक करण्याच्या महत्त्वावर भर दिला. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी त्यांनी काही महत्त्वाचे कृती–बिंदू मांडले, ज्यामध्ये राष्ट्रीय आयुष अभियान ची अधिक प्रभावी अंमलबजावणी, आयुष वैद्यकीय शिक्षणाच्या पायाभूत सुविधांचे बळकटीकरण, वेलनेस व मेडिकल व्हॅल्यू टुरिझमचा प्रसार, तसेच आयुष क्षेत्रातील खासगी सहभाग आणि प्रशिक्षित मनुष्यबळाला प्रोत्साहन देणे यांचा समावेश आहे. त्यांनी आयुषला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि राष्ट्रीय आरोग्य परिणाम सुधारण्यासाठी सामूहिक आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांची गरज असल्याचे आवाहन केले.

सचिव वैद्य राजेश कोटेचा यांनी ‘हर घर आयुर्योग’ हा आयुष आणि योग यांचा संगम असलेला उपक्रम प्रत्येक घरापर्यंत पोहोचविण्याची गरज अधोरेखित केली, कारण तो निरोगी भारत घडविण्यात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतो. ते पुढे म्हणाले की, सहा महत्त्वाच्या उपथीम्सभोवती उभारलेली ही दोन दिवसीय परिषद वर्तणूक बदलाच्या माध्यमातून या एकात्मिकरणाला गती देईल आणि आयुष धोरणांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात लक्षणीय योगदान देईल.

या परिषदेचा उद्देश राज्य/केंद्रशासित प्रदेशांच्या अधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेल्या राज्यनिहाय नोंदी व अभिप्राय नोंदी, तसेच तळागाळातील सूचना यावर सविस्तर चर्चा करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा आहे. अशा प्रकारचा सहभागात्मक दृष्टिकोन राष्ट्रीय आयुष अभियान अधिक बळकट करण्यासाठी आणि धोरणात्मकरीत्या विस्तारण्यासाठी महत्त्वाचा ठरणार आहे. हे अभियान आयुर्वेद, योग आणि निसर्गोपचार, युनानी, सिद्ध, सोवा–रिग्पा आणि होमिओपॅथी प्रणालींच्या एकात्मिकरणाद्वारे सर्वांगीण आरोग्यसेवा प्रोत्साहित करणारा एक महत्त्वाकांक्षी कार्यक्रम आहे.

उद्घाटन सत्राला आयुष मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव श्री. होवेदा अब्बास; संयुक्त सचिव सौ. कविता जैन आणि सौ. मोनालिसा दाश; उपमहानिदेशक श्री. सत्यजित पॉल; संयुक्त सचिव सौ. अलार्मेलमंगई डी; तसेच आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या वरिष्ठ आर्थिक सल्लागार सौ. इंद्राणी कौशल्य उपस्थित होत्या.

## २३ सष्टेबरला आयुर्वेद दिन साजरा केला जाणार : प्रतापराव जाधव

यावर्षीपासून २३ सप्टेंबर हा दिवस ‘आयुर्वेद दिन’ म्हणून साजरा केला जाईल. यावर्षी या दिनाचा दहावा वर्धापन दिन असून त्याची थीम आहे ‘‘जनतेसाठी आणि पर्यावरणासाठी आयुर्वेद’’. ही थीम वैयक्तिक आरोग्यवृद्धीसोबतच पर्यावरणीय शाश्वततेची हमी देण्यात आयुर्वेदाचे महत्त्व अधोरेखित करत केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना सक्रिय सहभाग घेण्याचे आणि आयुर्वेद दिनाला जागतिक आरोग्य उपक्रमाचे रूप देण्यासाठी एकत्रितपणे प्रयत्न करण्याचे आवाहन केले. संस्थात्मक विकासाच्या दृष्टीने, आयुषसंबंधित विमा विषयांवर भागधारकांना सहाय्य करण्यासाठी अखिल भारतीय आयुर्वेद संस्थेत प्रकल्प व्यवस्थापन प्रकोष्ठ कार्यान्वित करण्यात आल्याची घोषणा मंत्री महोदय यांनी केली

# दहा फुटी अजगर शेतात आढळला

## सर्पमित्र मुन्ना श्रीवास यांनी जीवदान दिले

दैनिक आपला विदर्भ

■ अहेम रजा खान



**मूर्तिजापूर :** तालुक्यातील दहातोंडा शिवारात एका शेतात तब्बल दहा फुटी अजगर आढळून आल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. मात्र सर्पमित्र मुन्ना श्रीवास यांनी मोठ्या शिताफिने अजगराला पकडून काटेपूर्णा अभयारण्यात सोडून जीवदान दिले.

चंदन राठोड यांचे दहातोंडा–मुरंबा रस्त्यालगत शेत असून, ते नेहमीप्रमाणे सकाळी शेतात काम करीत असताना त्यांना भला मोठा साप दिसला. घाबरलेल्या राठोडं यांनी आरडा–ओरड केल्याने शेजारील शेतातील मजूर व गावकऱ्यांनी तत्काळ मूर्तिजापूर येथील सर्पमित्र मुन्ना श्रीवास यांच्याशी संपर्क साधला. क्षणाचाही विलंब न करता घटनास्थळी धाव घेतलेल्या मुन्ना श्रीवास यांनी शेतातील विहिरीजवळ सुस्तावलेल्या अजगराला शोधून काढले. या अजगराचे वजन तब्बल १० ते १५ किलो असून, सुमारे ८ ते १० फूट लांबीचा तो पायथन प्रजातीचा असल्याचे त्यांनी सांगितले. सर्पमित्रांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, हा अजगर बिनविषारी असला तरी लहान मुलं व पाळीव प्राण्यांसाठी धोकादायक ठरू शकतो.

शेवटी मोठ्या शिताफिने पकडलेल्या या अजगराला काटेपूर्णा अभयारण्यात सुखरूप सोडण्यात आले. या घटनेनंतर शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असले तरी सर्पमित्र मुन्ना श्रीवास यांच्या धाडसी कार्याचे गावकऱ्यांनी कौतुक केले आहे.

# महिला बचत गट ठेव संचय संकल्पनेतून राजलक्ष्मी अर्बनची निर्मिती

**केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते ५ सष्टेबरला होणार उद्‌घाटन**

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** महिला बचत गट ठेव संचय संकल्पनेतून निर्माण झालेल्या राजलक्ष्मी अर्बन को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचा उद्घाटन सोहळा ५ सप्टेंबरला केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते होणार आहे.

भारतात स्वयंरोजगार महिला संघटनाच्या माध्यमातून १९७० च्या दशकात बचत गट कार्य सुरू झाले बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक स्वावलंबन निर्माण करून त्यांच्या जीवनात सुधारणा घडवून आणण्यासाठी बचत गटाची निर्मिती करण्यात आली आहे बुलढाण्यात एम्पायर महिला बचत गटातील महिलांनी जमा झालेल्या ठेव संचय संकल्पनेतून राजलक्ष्मी अर्बन महिला को–ऑपरेटिव्ह सोसायटीची स्थापना करण्यात आली आहे या महिला सहकारी पतसंस्थेचा उद्घाटन सोहळा ५ सप्टेंबरला केंद्रीय आयुष (स्वतंत्र प्रभार ) आरोग्य कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते होणार आहे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ,बुलढाणा विधानसभा मतदारसंघाचे आमदार संजय गायकवाड ,बुलढाणा अर्बनेचे अध्यक्ष राधेश्याम चांडक हे प्रमुख मार्गदर्शक तर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आमदार धीरज लिंगाडे माजी मंत्री राजेंद्र शिंगणे भाजपाचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार विजयराज शिंदे माजी आमदार घृपतराव सावळे शेतकरी नेते रविकांत तुपकर उबाठा शिवसेनेच्या प्रवक्त्या जयश्री शेळके जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत तलाठी पटवारी मंडळ अधिकारी समन्वयक महासंघाचे अध्यक्ष विजय टेकाळे जिल्हा उपनिबंधक डॉ महेंद्र चव्हाण तालुका निबंधक गजानन आमले उपस्थित राहणार आहेत बचत गटाच्या ठेव संचयातून निर्मित झालेल्या या महिला पतसंस्थेच्या कार्यक्रमाला महिलांनी आणि नागरिकांनीही उपस्थित रहावे असे आवाहन राजलक्ष्मी महिला अर्बन परिवाराच्या वतीने करण्यात आले

## डाक अदालत 10 सप्टेंबरला

**बुलढाणा/प्रतिनिधी:** पोस्ट विभागाच्या तक्रारी सोडविण्यासाठी बुलडाणा डाकघर विभागातर्फे बुधवार, दि. १० सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता डाक अदालत आयोजित करण्यात आले आहे. पोस्टाच्या कार्याविषयी किंवा कामकाजाबद्दल सहा आठवड्यात तक्रारींचे निवारण झालेले नसल्यास अशा तक्रारींची दखल डाक अदालतीमध्ये घेतल्या जाणार आहे.

देशातील पोस्टाची सेवा ही सामाजिक आणि आर्थिक जीवनाचा एक अभिन्न भाग आहे. देशातील प्रत्येक नागरिकांच्या मनामध्ये पोस्टाच्या सेवेने वेगळ्या प्रकारचे स्थान निर्माण केले आहे. पोस्ट खाते हे लोकांना चांगल्या प्रकारची सेवा देण्याचा व ग्राहकांचे जास्तीत जास्त समाधान करण्याचा प्रयत्न करते. ही सेवा देताना संभाषण, पत्रव्यवहार किंवा सेवेमध्यील काही त्रुटीमुळे पोस्टाच्या सेवेबद्दल तक्रारी होतात. तक्रारींचा योग्य प्रकारे न्याय निवडा करण्यासाठी पोस्ट खात्यातर्फे डाक अदालती घेण्यात येते. विशेषत: टपाल, स्पीड पोस्ट, डाक वस्तू पार्सल, बचत बँक आणि मनीऑर्डरबाबत तक्रारी विचारात घेतल्या जातील. तक्रारींचा उल्लेख सर्व तपशीलासह केलेला असावा. तक्रारीत तारीख आणि ज्या अधिकाऱ्यास मुळ तक्रार पाठविली त्याचे नाव आणि हुद्दा आदी संबधित माहिती डाक सेवेबाबत तक्रार डाकघर अधिक्षक गणेश आंभोरे, बुलडाणा विभाग, यांचे नावे दोन प्रतीत सोमवार, दि. ८ सप्टेंबर २०२५ पर्यंत पोहचेल, अशा रीतीने पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# अखेर आडगाव राजा येथील खड्डे बुजविण्यास सुरवात

## रामदास कहाळे यांच्या उपोषणाची सांगता; आमदार मनोज कायंदे यांचे तत्परता

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप





**बिबी:** सिंदखेड राजा तालुक्यातील आडगाव राजा ते सावखेड तेजन दरम्यान रस्त्यावरील जीवे घेणेखड्डे बुजविण्यासाठी रामदास कहाळे यांनी दिनांक २ सप्टेंबर रोजी सुरू केलेल्या उपोषणाची आमदार मनोज कायंदे यांनी दखल घेत कार्यकारी अभियंता यांना तात्काळ सदर खड्डे बुजविण्या संदर्भात आदेश दिल्याने आज दिनाक ३ सप्टेंबर रोजी कार्यकारी अभियंता गुडदे यांनी त्यांच्या शाखा अभियंता यांना सोबत घेऊन आडगाव राजा येथील रामदास कहाळे यांनी सुरू केलेल्या उपोषण स्थळी भेट देऊन आडगाव राजा ते सावखेड तेजन रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यास सुरवात करून उपोषणाची अखेर सांगता करण्यात आली.

याबतीत सविस्तर असे की आडगाव राजा ते सावखेड तेजन रस्त्यांवरील ठीक ठिकाणी खड्डे पडल्यामुळे आडगाव राजा सह परिसरातील नागरिकांना यांचा त्रास होत होता या अनुषंगाने रामदास कहाळे यांनी २० ऑगस्ट रोजी तहसीलदार यांच्या मार्फत जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन सदर खड्डे बुजविण्यात यावे अशी मागणी करून खड्डे न बुजविल्यास आमरण उपोषणाचा इशारा दिला होता परंतु कुठलीच कार्यवाही न झाल्याने रामदास कहाळे यांनी २ सप्टेंबर रोजी आडगाव राजा येथे आमरण उपोषणाला सुरुवात केली होती.

आडगाव राजा व सावखेड तेजन या रस्त्यावरील खड्डया संदर्भात व रामदास कहाळे यांचे आमरण उपोषण ही बाब नितीन शेळके,नितीन कांयदे , सिद्धार्थ जाधव यांच्या यांनी आमदार मनोज कायंदे यांच्या निदर्शनास आणून दिली आणि लगेच आमदार मनोज कायंदे यांनी मुंबई वरून तात्काळ कार्यकारी अभियंता गुडदे यांना संपर्क करून ताबडतोब आडगाव राजा व सावखेड तेजन रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यास सुरवात करा आणि उपोषण सोडवा असे निर्देश दिले यावरून आज कार्यकारी अभियंता यांनी उपोषण स्थळी भेट देऊन उपोषण स्थळी भेट दिली आणि तात्काळ खडे बुजविण्यास सुरवात केली आणि उपोषण निंबू पाणी देऊन सोडविले यावेळी प्रदीप बिल्होरे पाटील, विजय कुहिरे, बुद्धू चौधरी यांच्या सह जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. रामदास कहाळे यांनी सुरू केलेल्या उपोषणा दरम्यान गावातील सर्व च जेष्ठ श्रेष्ठ गावकरी मंडळी दोन्ही दिवस प्रामुख्याने हजर होती.